सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ६५ | शनिवार, दि. २९ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
२९ नोव्हेंबर

- नोबेल पारितोषिक विजेत्या सामाजिक कार्यकर्त्या मदर तेरेसा यांना त्यांच्या मूळ अल्बानियाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार गोल्डन ऑनरने सन्मानित करण्यात आले.
- नारायणगाव, महाराष्ट्र येथे जगातील सर्वात मोठ्या मीटरवेव्ह रेडिओ दुर्बिणीचे उद्घाटन करण्यात आले.
- शास्त्रीय गायक गुलाम मुस्तफा खान आणि घटम वादक टी. एच. विक्कू विनायक राम यांना उस्ताद हाफिज अली खान मेमोरियल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
- दक्षिण आफ्रिकेचे माजी अध्यक्ष डॉ. नेल्सन मंडेला आणि बांगलादेशच्या ग्रामीण बँकेला गांधी शांतता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


# राज्यातील सुमारे सहाशे मराठी शाळा बंद होणार?

## फडणवीस सरकारच्या शिक्षक समायोजनाच्या निर्णयाने विद्यार्थी, पालकांमध्ये चिंता!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यातील सुमारे ६०० सरकारी मराठी शाळा ६ डिसेंबरपासून बंद होण्याच्या मार्गावर आहेत. फडणवीस सरकारच्या शिक्षक समायोजनाच्या निर्णयामुळे ही भीती वाढली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकही चांगलेच धास्तावले आहेत. सुमारे २५ हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात आहे.

खरे तर वर्षानुवर्षं ग्रामीण भागात पालकांनी कितीही अडचणी असल्या तरी मुलांना शाळेत पाठवण्याची परंपरा जपली. शिक्षकही मनापासून शिकवत राहिले. मात्र, आता शिक्षक समायोजनाच्या अट्टहासामुळे शेकडो शाळांमध्ये शिक्षकच मंजूर न झाल्याने त्या शाळा बंद होण्याच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचल्या आहेत. परिणामी २५ हजार विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येऊ शकते ही गोष्ट लोकांच्या मनाला चटका लावते आहे. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाने या निर्णयाकडे गंभीरतेने पाहत शिक्षणमंत्री दादा भुसे आणि संचालकांना निवेदन देऊन समायोजन प्रक्रिया तात्काळ थांबवण्याची मागणी केली आहे.




हा निर्णय जसा आहे तसा लागू झाला तर गावोगावी शाळांचे दिवे विझणार आहेत. अनेक पालक म्हणतात, की आपल्या लेकराला जवळची शाळा बंद पाडली तर आम्ही त्याला कुठे घेऊन जावे? रोज प्रवास, खर्च, सुरक्षा सगळे कसे सांभाळायचे? गेल्या मार्चमध्ये शिक्षण विभागाने २०२४- २५ चा सेवक संच मंजूर केला. याच सेवक संचानुसार राज्यातील शाळांना शिक्षक मंजूर केले जातात. मात्र, यातून स्पष्ट झाले आहे, की शेकडो मराठी शाळांना एकही शिक्षक मंजूरच झाला नाही. अनेक ठिकाणी दोन शिक्षकांवर पाच-पाच वर्ग चालतात.

काही शाळांमध्ये तर परिस्थिती एवढी बिकट आहे, की एकही शिक्षक नसतानाही पालक शाळा बंद होऊ नये म्हणून मुलांना पाठवत आहेत. पुणे, नाशिक, कोल्हापूर, सोलापूर, अहिल्यानगर जिल्ह्यात किमान १५ ते २० शाळा अशा आहेत जिथे शिक्षकच नाही. ही फक्त आकड्यांची गोष्ट नाही, तर त्या-त्या शाळेत जाणाऱ्या मुलांचे, त्यांची स्वप्ने, भविष्य आणि एका गावाचा संपूर्ण शैक्षणिक कणा धोक्यात आहे. शिक्षक संघटनांनी उच्च न्यायालयातही याचिकांद्वारे हा निर्णय दुरुस्त करावा अशी मागणी केली होती. मात्र, याचिका फेटाळल्या गेल्यावर शिक्षण संचालकांनी ५ डिसेंबरपर्यंत शिक्षक समायोजन पूर्ण करण्याचे आदेश काढले. म्हणजे ६ डिसेंबरपासून अनेक शाळांचे कुलूप लागण्याची शक्यता अधिकच तीव्र होते. पूर्वी २० विद्यार्थी नसले तरी नववी-दहावीला शिक्षक मंजूर होते. मात्र, २०२४ च्या जीआर नुसार आता किमान २० विद्यार्थी असणे बंधनकारक आहे. ग्रामीण भागात स्थलांतर, कुटुंबांची आर्थिक स्थिती, शेतीवर अवलंबित्व या सगळ्यामुळे अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या २० च्या खाली आहे. मात्र, म्हणून शाळा बंद करायची का? अशा संतप्त भावना पालकांनी व्यक्त केल्या आहेत.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...! जय स्वदेशी...!!

जगातील सर्वांत उंच इमारत;
**एका फ्लॅट भाडे ४२ लाख**
पान २ वर...

**रत्नागिरीतील अठरा हातांचे गणपती बाप्पा!**
पान ४ वर...

# प्रांताधिकाऱ्यांचा वाळू माफियांना दणका!

## नदी पात्राकडे जाणारे रस्ते प्रशासनाकडून बंद!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- नूतन प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी पदभार स्वीकारताच अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांविरूद्ध धडक मोहीम सुरू केली आहे. जळोद येथील तापी नदी पात्रातील परिसराची त्यांनी पाहणी केली आहे. तापी नदीवरील पुलाखाली सुमारे १०० मीटरच्या आत मोठ्या प्रमाणावर वाळू चोरी झाल्याचे आढळून आले आहे. नदीपात्रातील मोठमोठे खड्डे आणि पुलाला धोका लक्षात घेता श्री. भंगाळे यांनी पथकांची त्यांनी नेमणूक केली आहे. प्रशासनने नदी पात्रातील रस्ते खड्डे करून बंद केले आहेत.

तालुक्यातील पोलीस पाटील, कोतवाल, ग्राम महसूल अधिकारी यांना अवैध वाळू वाहतुकीवर नियंत्रण मिळवण्यासाठी कठोर पावले उचलण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अमळनेर- चोपडा मार्गे मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू वाहतूक सुरू असल्याचे निदर्शनास आल्याने जेसीबीच्या साहाय्याने नदीपात्राकडे जाणारे रस्ते खोदून बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे लहानमोठी वाहने नदीपर्यंत पोहोचू शकणार नाहीत. अवैध वाहतूक रोखण्यासाठी तालुक्यात पाच विशेष पथके नियुक्त करण्यात आले आहेत. अहोरात्र अशा दोन सत्रात त्यांची गस्त सुरू आहे. प्रत्येक पथकात मंडळ अधिकारी, महसूल कर्मचारी आणि पोलीस पाटील अशा सहा जणांचा समावेश आहे. आठवड्याचे वेळापत्रक निश्चित करून गस्तीसाठी ठिकाणांची विभागणी करण्यात आली आहे.





"अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी स्वतंत्र बैठे पथकांची नियुक्ती केली आहे. कोणत्याही नागरिकाला अवैध उत्खनन व वाळू वाहतूक होत असेल, तर त्यांनी जे पथक नेमले आहेत त्यांना तत्काळ माहिती द्यावी अथवा संबंधित पोलीस ठाण्यास माहिती द्यावी.

**– मयुर भंगाळे,**
प्रांताधिकारी, अमळनेर.

### प्रांताधिकारी भंगाळेंचे इरादे नेक... इतरांचे काय?

*प्रांताधिकारी मयुर भंगाळे रुजू झाल्यापासून वाळू चोरी काहीशी कमी झाली आहे. मात्र, पूर्ण बंद झालेली नाही. श्री. भंगाळे यांचे इरादे खूप चांगले आणि स्वच्छ आहेत. मात्र, त्यांच्या ज्या सहकाऱ्यांच्या विश्वासावर त्यांनी वाळू चोरी थांबविण्याचा निर्धार केलेला आहे, त्यांचेही इरादे तपासणे गरजेचे आहे. वाळू माफियांप्रमाणेच यंत्रणेतील काहींवर लक्ष ठेवावे लागेल. तरच श्री. भंगाळे यांना अपेक्षित असलेली वाळू चोरी थांबेल.*

### दर दोन तासांनी अहवाल

सर्व पथकांना दर दोन तासांनी व्हॉट्सॲप ग्रुपवर फोटोसह अहवाल पाठवणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच परिसरातील अवैध वाळू साठ्यांवर पंचनामे करून कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अहवाल न पाठवणाऱ्या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा कायदा १९७९ नुसार कारवाई केली जाईल, असा इशारा प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी दिला.

### या ठिकाणांवर पथकांची नेमणूक

बोरी नदीकाठ- अमळनेर, फापोरे, अंतुर्ली, हिंगोणे, तासखेडा, बहादरवाडी, करणखेडे, पांझरा नदी काठ, मांडळ, मुडी, कलंबू, भिलाली परिसर, पांझरा नदी परिसर, शहापूर, तांदळी, खेडी-खर्दे, वासरे, कळमसरे. तापी नदी काठ- हिंगोणे, दोधवद, जळोद, निंभोरा, अमळगाव, पातोंडा, मठगव्हान, धावडे, सावखेडा, खापरखेडे प्र. अ., कामतवाडी, धुरखेडा.

# उमेदवारांची निघाली वारी, हात जोडून मतदारांच्या दारी!

## समर्थक, कार्यकर्त्यांना खूश ठेवण्यासाठी पार्ट्या


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**
**रजनीकांत पाटील**

अमळनेर : पालिका निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवारांना चिन्हे वाटपही झाले आहे. आता प्रत्यक्ष प्रचाराला वेग आला आहे. उमेदवारांची वारी आता हात जोडून मतदारांच्या दारोदारी जात आहे. एकीकडे मतदारांच्या भेटीगाठी चालू आहेत, तर दुसरीकडे प्रचारात सहभागी असलेल्या कार्यकर्ते आणि समर्थकांना खूश ठेवण्यासाठी रात्री उशिरापर्यंत सर्वच हॉटेल्स् फुल दिसून येत आहेत. गुलाबी थंडीत निवडणुकीचे वातावरण चांगलेच तापू लागले आहे.

उमेदवारांना सकाळच्या प्रहरी आणि सायंकाळी मतदारांना घरी भेटण्याची संधी मिळते. अनेक उमेदवार नेमकी हीच वेळ साधत आहेत. समर्थक आणि प्रचारकांच्या लवाजम्यासह ते घरोघरी भेट देत आहेत. कुठे नातेसंबंधांचे तर कुठे जुन्या मैत्रीचे उल्लेख करून आपुलकीची छबी निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. मतदारांना "हक्काचा उमेदवार" म्हणून साद घातली जात आहे. दिवसभर प्रचाराच्या रणधुमाळीत




सोबत असणाऱ्या समर्थक आणि प्रचारकांचा थकवा मिटवण्यासाठी रात्री उशिरापर्यंत ओल्या पार्ट्या सुरू आहेत. मतदान अवघ्या काही दिवसांवर आल्याने उमेदवारांची मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी धडपड सुरू आहे. दरम्यान, काही नगरसेवकांनी केलेल्या कामाची वाहवा होत असली तरी रखडलेल्या कामाची मतदार आवर्जून आठवण करुन देत आहेत. पक्षाकडे तिकिटाची मागणी करूनही उमेदवारी न मिळालेल्या नाराज कार्यकर्त्यांनी आता महत्त्वपूर्ण भूमिका घेतली आहे. त्यांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता आपली उमेदवारी कायम ठेवली आहे. विविध प्रभागांत चांगलीच चुरशीची लढत होणार आहे. उमेदवार भाऊ, ताई, काका, काकू, आजी- बाबा अशी मतदारांना हाक देत आहेत.



# साने गुरुजी शाळेजवळील रस्त्यावर गतिरोधकाची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- धुळे महामार्गावरील साने गुरुजी विद्यालयाजवळ एका बाजुला फायबर गतिरोधक तुटला आहे. त्याच्या जवळपास कुठेही गतिरोधक उभारण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहने सुसाट धावत आहेत. याच मार्गावर शाळा, महाविद्यालय, हॉस्पिटल, मेडिकल दुकाने आहेत. चौफुली जवळच असल्याने विद्यार्थी- विद्यार्थिनी या मार्गाने ये- जा करतात. परिणामी मोठ्या अपघाताचा धोका आहे. त्यामुळे गतिरोधकाची मागणी प्रवाशांमधून होत आहे.

शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेला विद्यार्थ्यांची या रस्त्यावरून मोठी गर्दी असते. मात्र, रस्ता ओलांडताना विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून जावे लागते. त्यातच गतिरोधक नसल्याने भरधाव वाहनांनी अपघाताची शक्यताही नाकारता येत नाही. शाळा परिसरापासून पुढे हाकेच्या अंतरावर आमदारांच्या निवासस्थानाकडे वळणारा रस्ता आहे. दुसऱ्या बाजूला गावात जाणारा रस्ता आहे. पुढे सरळ धुळे जाणाऱ्या महामार्ग आहे. त्यामुळे वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. धुळ्याकडून शहरात येणारा मुख्य महामार्ग व पुढे जळगाव, चोपडा, पारोळाकडे जाणारा रस्ता असल्याने अवजड वाहनांसह इतर छोटी मोठी वाहनधारकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. परिणामी वाहनांचा वाढता वेग अपघाताला निमंत्रण देणारा ठरत आहे. काही विद्यार्थी विद्यालयात येताना पायदळ व काही सायकलवर येतात. अनेक टवाळखोर धूमस्टाइलने दुचाकी चालवितात. तसेच ट्रिपल सीट रपेटही मारतात. यामुळे लक्ष विचलित होऊन अपघातही होतात. त्यामुळे विद्यार्थी सुखरूप घरी परत जाण्यापर्यंत धाकधूक असते.

# शहराच्या सर्वांगीण विकासासाठी 'शविआ' कटिबध्द

## विकासाचा जाहीरनामा सादर; ५०० कोटी रूपये निधीतून विविध विकासकामे!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- सर्वांगीण विकासातून शहराचा झपाट्याने कायापालट होत आहे. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, खासदार स्मितताई वाघ, माजी आमदार कृषिभूषण साहेबरावदादा पाटील, माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील यांच्या दूरदृष्टीने विकासाची एक वेगळी दिशा शहराला मिळाली आहे. ५०० कोटी रूपयांहून अधिक निधीतून शहरात विविध






विकासकामे सुरू आहेत. येणाऱ्या काळात विकासाचा रथ पुढे नेण्यासाठी अमळनेर तालुका शहर विकासाचे लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जितेंद्र ठाकूर तसेच १८ प्रभागातील ३५ उमेदवारांना विजयी करण्याचे, आवाहन शहर विकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. शहराच्या विकासासाठी आघाडीच्या माध्यमातून जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला आहे. यातील अनेक कामे प्रगतीपथावरही आहेत.

### 'शविआ'चा जाहीरनामा

शहरासाठी १९७ कोटी रूपयांची पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर कार्यान्वित करून प्रत्येक घराला मुबलक पिण्याचे पाणी मिळणार. शहरातील प्रत्येक भागात विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत अभ्यासिका उभारल्या जाणार. तरुणांसाठी प्रत्येक प्रभागात सुसज्ज व्यायामशाळा तयार होणार. प्रत्येक प्रभागात वयोवृद्ध, महिला, चिमुकल्यांसाठी सर्व सोयीसुविधायुक्त नाना-नानी पार्क उभारण्यासाठी कटिबद्ध. राज्यात आदर्श ठरेल अशा क्रीडासंकुलाचे काम प्रगतीपथावर. खेळाडूंना उच्च दर्जाच्या सेवा येणाऱ्या काळात मिळतील. डिपी रस्त्यांच्या माध्यमातून शहरातील अंतर्गत रस्त्यांचे जाळे उभे करून शहरातील दळणवळण सोयीस्कर होणार. शहरात नव्याने उभारण्यात येत असलेल्या उपजिल्हा रुग्णालयाच्या माध्यमांतून नागरिकांना अद्ययावत आरोग्य सुविधांसोबतच दुर्धर आजारांवरील शस्त्रक्रिया पार पडणार आहेत. शहरातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी ठिकठिकाणी ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली जाणार आहे. शहरात होणारा प्रत्येक रस्ता दीर्घकाळ टिकणारा असेल. संत सखाराम महाराज संस्थान, श्री मंगळ ग्रह संस्थानाचा विकास करून शहराला पर्यटनाच्या माध्यमातून देशभर नेणार असल्याचा संकल्प करण्यात आला आहे. खुल्या भूखंडावरील उद्यानामध्ये जापानच्या धर्तीवर व्यायाम करता करता ऊर्जा निर्माण होईल, असे तंत्रज्ञान उभारण्याची सोय होणार. ५. ५० कोटी रूपयातून पैलाड, ताडेपुरा भागातील ताडे तलावाच्या सुशोभीकरणाला सुरवात झालेली असून तेथे पर्यटनाचे केंद्र तयार होणार. झामी चौक तसेच गांधलीपुरा भागातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्यासाठी पाच कोटी रुपयांमधून जलकुंभाची उभारणी केली जात आहे.

२५ कोटी रूपये निधीतून प्रशासकीय इमारत, महसूल इमारत तसेच पंचायत समितीच्या नवीन इमारतींचे काम पूर्णत्वाकडे. नागरिकांना एकाच छताखाली सर्व शासकीय कार्यालये उपलब्ध होणार आहेत. पैलाड भागातील स्मशानभूमीला आधुनिक बनविण्यासाठी १ कोटी रूपयांचा निधी उपलब्ध. काम प्रगतीपथावर. शहरात विविध ठिकाणी सार्वजनिक स्वच्छतागृह उभारून शहराच्या स्वच्छतेची काळजी घेतली जाणार आहे. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरातील गुंडगिरीला आळा घालण्यासाठी शहरभर सीसीटीव्हीचे जाळे उभे राहणार. पालिकेच्या माध्यमातून लघु उद्योगांची उभारणी करून गरीब व वंचित घटकांना रोजगार उपलब्ध करून दिला जाणार आहे. पालिकेच्या माध्यमातून फिरता दवाखाना सुरू करण्यासाठी प्रयत्न होणार. शहरातील इतर समाजांसोबतच अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अद्ययावत शादीखाना, कब्रस्तान सुशोभीकरण, अल्पसंख्याक भागातील रस्ते या विकासावर भर. खासदार, आमदार व पालिकेच्या माध्यमातून विविध विकासकामे होणार. अमळनेर शहर विकास आघाडीला मत म्हणजे शहराच्या सर्वांगीण विकासाला मत, असल्याचे सुतोवाच शविआच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# मसाला पान





# समुद्रकिनाऱ्यावर रेती का असते?

## निर्मिती आणि कारणे जाणून घ्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

समुद्रकिनाऱ्यावरील रेती ही निसर्गाची एक अनोखी निर्मिती आहे. ती कशी तयार होते आणि किनाऱ्यावर का जमा होते, यामागील कारणे खालीलप्रमाणे आहेत.

खडकांचे अपक्षरण

डोंगर, जमीन आणि किनाऱ्याजवळील मोठे खडक सूर्यप्रकाश, पाऊस, वारा आणि तापमानातील बदल (उष्णता-थंडी) यांच्या सततच्या प्रभावामुळे तुटतात. यामुळे खडकांचे लहान तुकडे तयार होतात. ज्यांना रेतीचे कण म्हणतात.

नद्यांद्वारे वहन

नद्या आपल्या मार्गातील खडकांचे तुकडे, माती आणि गाळ समुद्रात वाहून नेतात. हे लहान कण की ज्यांना रेती म्हणतात ते नदीच्या प्रवाहातून समुद्रकिनाऱ्यापर्यंत पोहोचतात.

कणांचे गोलाकार होणे

नदीच्या प्रवासात आणि समुद्राच्या लाटांच्या सततच्या माऱ्यामुळे हे खडकांचे तुकडे एकमेकांवर घासले जाऊन त्यांचे कोपरे झिजतात. परिणामी हे कण गोलाकार आणि गुळगुळीत बनतात. जे रेतीचे वैशिष्ट्य आहे.

लाटांमुळे क्षरण

समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर सतत आदळून किनारी आणि तळातील खडक तोडतात. यातून स्थानिक पातळीवर रेती तयार होते, जी किनाऱ्यावर जमा होते.

रेतीचे निक्षेपण

नदी समुद्राला मिळताना तिचा वेग कमी होतो. त्यामुळे ती वाहून आणलेला गाळ आणि रेती किनाऱ्यावर किंवा समुद्रतळावर साठते. यामुळे किनाऱ्यावर रेतीचे थर तयार होतात.

टिकाऊ खनिजांचे योगदान

रेती प्रामुख्याने क्वार्टझ आणि फेल्डस्पारसारख्या कठीण खनिजांपासून बनलेली असते. ही खनिजे इतर खडकांपेक्षा जास्त टिकाऊ असतात आणि लांब पल्ल्याचा प्रवास सहन करू शकतात. ज्यामुळे ती किनाऱ्यावर टिकून राहतात.

वाळूचे ढिगारे आणि संरक्षण

वाऱ्यामुळे किनाऱ्यावरील रेती आतील बाजूस जमा होऊन वाळूचे ढिगारे तयार होतात. हे ढिगारे नैसर्गिक बांधासारखे काम करतात. जे किनाऱ्याचे लाटांपासून संरक्षण करतात.

स्थिरता

पाण्याच्या सततच्या हालचालींमुळे बारीक मातीचे कण (सिल्ट आणि क्ले) दूर वाहून जातात. जाड रेतीचे कण किनाऱ्यावर स्थिर राहतात. यामुळे समुद्रकिनाऱ्याला मजबुती आणि आधार मिळतो.

# डिसेंबरच्या गुलाबी थंडीत फिरायला जाताय?

## महाराष्ट्रातील या ठिकाणांना नक्की भेट द्या

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

राज्यात गुलाबी थंडीला सुरुवात झाली आहे. अनेकजण डिसेंबरमध्ये फिरायला जाण्याची योजना आखत आहेत. मात्र, थंडीत फिरायला जाण्यासाठी काही प्रमुख ठिकाणे आहेत, त्याबद्दल जाणून घेऊयात.


■ **महाबळेश्वर :**
गुलाबी थंडीचा आनंद घ्यायचा असेल तर महाबळेश्वर हा उत्तम पर्याय आहे. या काळात स्ट्रॉबेरीचाही हंगाम सुरू होतो. येथे आर्थर सीट पॉइंट, विल्सन पॉइंट, वेण्णा लेक (बोटिंग) या ठिकाणांना भेट देणे अविस्मरणीय आहे.

■ **पाचगणी :**
पाचगणी हे ठिकाण महाबळेश्वरच्या जवळच आहे. येथील निसर्ग आणि दऱ्यांचे दृश्य खूप सुंदर आहे. टेबल लँड, सिडनी पॉइंट, पारसी पॉइंट या ठिकाणांना भेट देऊ शकता.

■ **चिखलदरा (अमरावती) :**
चिखलदरा हे विदर्भातील एकमेव थंड हवेचे ठिकाण आहे. येथे कॉफीची शेती केली जाते. येथे गेल्यावर तुगाविलगड किल्ला आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाला भेट देता येईल.

■ **आंबोली (सिंधुदुर्ग) :**
आंबोली हे कोकणातील थंड आणि शांत ठिकाण आहे. येथील निसर्ग खूप सुंदर आहे. येथे तुम्ही आंबोली घाट, हिरण्यकेशी मंदिर, सनसेट पॉइंटला भेट देऊ शकता.

■ **इगतपुरी :** इगतपुरी हे नाशिकजवळचे एक शांत आणि कमी गजबजलेले ठिकाण आहे. येते ट्रेकिंगसाठी लोक येतात. येथील भातसा व्हॅली, कळसूबाई शिखर, विपश्यना केंद्र आहे. तुम्ही या ठिकाणांना भेट देऊन गुलाबी थंडीचा आनंद घेऊ शकता.



# अवघ्या ३६ व्या वर्षी दोन व्यवसायांचा मालक

## सामान्य कुटुंबातील मुलाने उभारले कोटींचे साम्राज्य

**सक्सेस स्टोरी...!**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



पंकज मिश्रा एका सामान्य कुटुंबात वाढला. जो गोरखपूर हून नंतर दिल्लीला स्थलांतरित झाला. तो त्याच्या एम. टेक. बॅचमध्ये सुवर्णपदक विजेता होता. त्यानंतर त्याने लॉजिस्टिक्स क्षेत्रात प्रवेश केला आणि काही वर्षांतच ३५ कोटी रुपयांची यशस्वी कंपनी स्थापन केली. पण पंकज मिश्राचे स्वप्न इतकेच मर्यादित नव्हते. आता त्याने पुढील तीन वर्षांत चारशे कोटी रुपये उत्पन्न मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवून बेकरी क्षेत्रातही प्रवेश केला आहे.

मजबूत शैक्षणिक पाया आणि समस्या सोडविण्याची मानसिकता असलेल्या पंकजने लावा इंटरनॅशनल आणि दिल्लीवरीसारख्या कंपन्यांमध्ये काम केले. त्याने लवकरच स्वतःची ओळख निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्याच्या पत्नी आणि निवृत्त वडिलांच्या मदतीने त्याने २०१९ मध्ये पी एन डी ग्लोबल लॉजिस्टिक्सची सहस्थापना केली. व्यवसाय वेगाने वाढला. पहिल्या वर्षी ५१ लाख वरून तो काही वर्षांतच ३५ कोटी रुपयांवर पोहोचला. त्याच्या शाखा देशभर आणि परदेशात विस्तारल्या. या यशानंतरही पंकजला एक ग्राहक केंद्रित ब्रँड तयार करायचा होता जो दैनंदिन जीवनाशी जोडला जाईल. डिसेंबर २०२४ मध्ये पंकज मिश्राचे ध्येय सामान्य माणसापर्यंत प्रीमियम गुणवत्ता पोहोचणे होते. त्याने त्याच्या उत्पादनांना आकर्षक नावे दिली. बेकरी मार्केट समजून घेण्यासाठी त्यांनी डॉ. गिरीश गुप्ता यांच्यासारख्या सल्लागारांचे मार्गदर्शन घेतले. हा ब्रँड दहा रुपयांच्या पॅकेटमध्येही चांगल्या पॅकेजिंग आणि चवीची हमी देतो. भविष्यात ते नाचणी आणि ज्वारीवर आधारित, साखर मुक्त, निरोगी स्नॅक्स सादर करण्याची योजना आखत आहेत.

गुणवत्तेच्या त्याच्या आवडीमुळे पंकज ने सुरुवातीपासूनच त्याच्या स्वतःच्या कारखान्यात त्याची उत्पादने तयार केली. इतर अनेक ब्रँड प्रमाणे तृतीय-पक्ष उत्पादनाऐवजी शंभर टक्के मेड इन इंडिया मशिनरी वापरून. बेकरी व्यवसाय पुढील सहा महिन्यात तोडगा काढण्याचे आणि पूर्ण क्षमतेने पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त मासिक उत्पन्न मिळविण्याची उद्दिष्ट ठेवले आहे. पंकज ने तीन वर्षात ४०० कोटी रुपये लक्ष्य ठेवले आहे. पंजाब, हरियाणा आणि दिल्ली-एनसीआरमध्ये वितरकांची संख्या मजबूत केली जात आहे. लवकरच ब्लिंकिट आणि झेप्टोद्वारे त्याची पोहोच वाढेल. पंकज मिश्रा ची कहाणी दर्शविते, की लहान सुरुवात देखील मोठ्या व्यवसायाकडे नेऊ शकते.



## जगातील सर्वांत उंच इमारत;

# एका फ्लॅटचे भाडे ४२ लाख

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जगातील सर्वांत उंच इमारत बुर्ज खलिफा आहे. जी दुबई, संयुक्त अरब अमिरात येथे स्थित असून तिची उंची ८२८ मीटर (२,७१७ फूट) आहे. ही इमारत १६३ मजली असून २०१० मध्ये पूर्ण झाली. बुर्ज खलिफा आता देखील जगातील सर्वांत उंच गगनचुंबी इमारत म्हणून प्रसिद्ध आहे. यात जगातील सर्वांत उंच मस्जिद, स्विमिंग पूल आणि अत्यंत जलद लिफ्ट यांसारख्या सुविधा आहेत. बुर्ज खलिफातील एका १ बीएचके अपार्टमेंटचे भाडे सुमारे ४२ लाख रुपये (दरवर्षी) इतके असल्याचे समजते. या इमारतीतील ९०० अपार्टमेंटपैकी १५० अपार्टमेंट भारतीय मालकीचे असून, त्यापैकी २२ फ्लॅट एकाच भारतीय व्यावसायिक जॉर्ज व्ही. नेरेम्परंबिल यांच्या मालकीतील आहेत. त्यामुळे त्याला ' बुर्ज खलिफाचा राजा ' असेही संबोधले जाते.

बुर्ज खलिफा वगळता जगातील इतर उंच इमारतींमध्ये मलेशियातील मर्डेका ११८ (६७९ मीटर), चीनमधील शंघाई टॉवर (६३२ मीटर), सौदी अरबमधील अबराज अल बैत (६०१ मीटर) आणि चीनमधील पिंग एन फाइनेंस सेंटर (५९९ मीटर) यांचा समावेश होतो. भविष्यकाळात ३२ किलोमीटर उंचीची इमारत देखील बनवण्याचा विचार आहे. पण ती अजून स्वप्न आहे.

एकूणच बुर्ज खलिफा ही इमारत केवळ उंचीनेच नव्हे, तर अपार्टमेंटच्या भाड्यांनीही जगात वेगळी ओळख मिळविली आहे. ज्यामुळे हा विषय मनोरंजक आणि महत्त्वाचा ठरतो.

# ' चोली के पीछे क्या है ' आयटम साँगमुळे माधुरी दीक्षितचे करिअर आले होते धोक्यात



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सुभाष घई दिग्दर्शित १९९३ मध्ये प्रदर्शित झालेल्या ' खलनायक ' चित्रपटातील ' चोली के पीछे क्या है ' हे आयटम साँग माधुरी दीक्षित आणि संजय दत्त यांच्यामुळे देशभरात लोकप्रिय झाले. अलका याग्निक आणि ईला अरुण यांच्या गायनाने सजलेल्या या गाण्याने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला. या चित्रपटाने ४ कोटींच्या बजेटवर २१ कोटींची कमाई केली. मात्र, गाण्यातील बोल्ड बोल आणि डान्समुळे ते वादग्रस्त ठरले. अनेकांनी ते अश्लील असल्याचा आरोप करत विरोध केला. ज्यामुळे दूरदर्शन आणि ऑल इंडिया रेडिओने या गाण्यावर बंदी घातली होती.

### बाळासाहेब ठाकरेंची यशस्वी मध्यस्थी

**बाळासाहेब ठाकरेंची भूमिका**

या काळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी माधुरीच्या बाजूने उभे राहिले. त्यांनी गाण्यात काहीही अश्लील नसल्याचे जाहीरपणे सांगितले. त्यानंतर विरोध करणाऱ्यांना आवाहन केले, की हे गाणे संस्कृतीविरोधी नाही. बाळासाहेबांची ही मध्यस्थी निर्णायक ठरली. त्यांच्या समर्थनामुळे वाद शांत झाला. गाण्यावरील बंदी हळूहळू उठवली गेली. माधुरी दीक्षित यांनी नंतरच्या मुलाखतीत या घटनेचा उल्लेख करत बाळासाहेबांच्या पाठिंब्याबद्दल त्यांचे उपकार मानले. ज्यामुळे त्यांचे करिअर वाचलेही आणि ते अजून मजबूतही झाले.

**कोर्टात पोहोचलेले प्रकरण**

वाद वाढत गेला आणि प्रकरण थेट कोर्टात गेले. सामाजिक कार्यकर्ते आणि राजकीय पक्षांनी गाणे बंद करण्याची मागणी केली. ज्यामुळे माधुरी दीक्षितचे करिअर धोक्यात आले होते. त्याकाळी माधुरी ही बॉलीवूडची टॉप अभिनेत्री होती. हा वाद त्यांच्या प्रतिमेला धक्का देऊ शकला असता. कोर्टाने गाण्यावर तात्पुरती बंदी घातली. ज्यामुळे चित्रपट आणि माधुरीच्या भविष्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली होती.

**माधुरीचे यश आणि वारसा**

या वादानंतरही माधुरी दीक्षितने ' हम दिल दे चुके सनम ', ' बेटा ' आणि ' देवदास 'सारखे हीट चित्रपट दिले. ' चोली के पीछे क्या है ' हे गाणे आजही लोकप्रिय आहे. माधुरीचे डान्स आयकॉन म्हणून ओळखीचे प्रतीक ठरले. ही घटना दाखवते, की वादग्रस्त निर्णय कधी-कधी करिअरला धोका आणू शकतात. परंतु योग्य समर्थनाने ते यशात बदलू शकतात. बाळासाहेब ठाकरेंची ही भूमिका त्यांच्या कलावंतांवरील प्रेमाचे उदाहरण आहे.

# एक तोळा, १० तोळे, ५० तोळे, बँकेच्या लॉकरमध्ये किती सोने ठेवता येते?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतामध्ये सोने सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. चोरी आणि अन्य कारणांमुळे सोन्याचे दागिने गहाळ होण्याची शक्यता असते. मात्र, यावरील उपाय म्हणून काही जण दागिने बँकेच्या लॉकरमध्ये ठेवण्याचा सुरक्षित पर्याय वापरतात. लॉकरमध्ये दागिने ठेवणे हा महत्त्वाचा पर्याय आहे. सोने लॉकरमध्ये ठेवल्यास दागिने चोरी होण्याची भूत राहत नाही. जेव्हा आवश्यकता असेल तेव्हा काढू शकता. बँका यासाठी काही शुल्क आकारतात. त्याच्या बदल्यात दागिन्यांच्या सुरक्षेची जबाबदारी घेते. मात्र, लॉकरमध्ये दागिने ठेवण्यासाठी काही नियम आहेत.

**घरात किती सोने ठेवता येते?**

आयकर कायद्यानुसार विवाहित महिला ५०० ग्रॅम म्हणजेच ५० तोळे सोने घरी ठेवू शकतात. तर अविवाहित महिलांसाठी ही मर्यादा २५० ग्रॅम आहे. पुरुष त्यांच्या नावावर १०० ग्रॅम सोने ठेवू शकता. म्हणजेच घरात सोने ठेवण्याचे नियम प्रत्येकासाठी वेगवेगळे आहेत. उदा.- एका कुटुंबात विवाहित पुरुष आणि महिला १०० ग्रॅम आणि ५०० ग्रॅम मिळून ६०० ग्रॅम सोने घरी ठेवू शकतात.

**लॉकरसंदर्भातील नियम**


दिवाळीनंतर बँकिंगसंदर्भातील नियम बदलले आहेत. त्यानुसार लॉकर ज्या व्यक्तीच्या नावे उघडले जाते त्याला प्राधान्य यादी द्यावी लागेल. म्हणजेच बँकेकडून लॉकर सेवा घेताना सुरूवातीला लिहून द्यावे लागेल की त्याच्या मृत्यूनंतर लॉकर उघडण्याचा अधिकार कोणाला असेल. याचा हेतू सुरक्षा अधिक भक्क करणे आणि भविष्यातील कायदेशीर वाद रोखणे आहे. यापूर्वी लॉकर धारकाचा मृत्यू झाल्यानंतर कुटुंबातील सदस्यांमध्ये वाद निर्माण व्हायचे. मात्र, आता प्राधान्य यादी असल्याने त्या यादीनुसार पहिल्या क्रमांकावर ज्याचे नाव असेल त्याला लॉकर उघडण्याचा अधिकार असेल. तो जर उपस्थित नसेल तर त्याच्याऐवजी दुसऱ्या क्रमांकाचा व्यक्ती लॉकर उघडू शकतो.



**सोने लॉकरमध्ये ठेवण्याबाबत नियम काय?**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या माहितीनुसार बँकेच्या लॉकरमध्ये सोने ठेवण्याची कमाल मर्यादा नाही. मात्र, लॉकरमध्ये किती सोने ठेवायचे याबाबत प्रत्येक बँकांचे धोरण वेगळे आहे. याशिवाय तुमच्याकडे याचे देखील पुरावे असावेत की सोने योग्य पद्धतीने खरेदी केलेले असावे. म्हणजेच बँक लॉकरमध्ये सोने किती ठेवायचे याबाबत आरबीआयचे कोणतेही नियम नाहीत. बँक लॉकरमध्ये सोने लॉकरमध्ये ठेवणे हे ग्राहकांवर अवलंबून असते.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# धर्मेंद्र यांना भेटू दिले नाही, शोक सभेतही दिसल्या नाहीत हेमा मालिनी ?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अभिनेते धर्मेंद्र यांनी २४ नोव्हेंबर रोजी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही दिवसापासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर धर्मेंद्र यांना जुहू येथील घरी नेण्यात आले. राहत्या घरीच धर्मेंद्र यांनी अखेरचा श्वास घेतला. निधनानंतर २७ नोव्हेंबर रोजी धर्मेंद्र यांच्यासाठी मुंबई येथील ताज लँड्स एन्डमध्ये शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. शोक सभेत धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी अनेक सेलिब्रिटी पोहोचले होते. मात्र, हेमा मालिनी आणि त्यांच्या मुली ईशा देओल, अहाना दिसल्या नाहीत. देओल कुटुंबाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रेयर मीटमध्ये सनी देओल, बॉबी देओल, आई प्रकाश देओल यांच्यासह अन्य नातेवाईक देखील उपस्थित होते. बॉलिवूडमधून धर्मेंद्र यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी शाहरुख खान, आर्यन खान, सलमान खान, रेखा, अभिषेक बच्चन, ऐश्वर्या रॉय बच्चन, अमीषा पटेल, सोहा अली खान, सिद्धार्थ मल्होत्रा, नेहा धूपिया, अंगद बेदी, सुनील शेट्टी, जॅकी श्रॉफ यांसारखे अनेक सेलिब्रिटी पोहोचले होते.

धर्मेंद्र यांच्या शोक सभेत हेमा मालिनी दिसल्या नाहीत. अशात अनेक सेलिब्रिटी त्यांच्या घरी पोहोचले. हेमा मालिनी यांनी त्यांच्या घरात धर्मेंद्र यांच्यासाठी पूजा ठेवली होती. माहितीनुसार महिमा चौधरी, अभिनेता गोविंदा यांच्या पत्नी सुनीता आहूज आणि मुलगा यशवर्धन हेमा मालिनी यांच्या घराबाहेर दिसल्या. एका व्हायरल व्हिडिओनुसार, धर्मेंद्र यांची पूजा करण्यासाठी एक पुजारी हेमा मालिनी यांच्या घरी पोहोचला होता. मात्र, हेमा आणि त्यांच्या मुली, ईशा आणि अहाना, शोक सभेला का उपस्थित राहिल्या नाहीत. याबद्दल काहीही कळलेले नाही.

धर्मेंद्र यांच्या शेवटच्या दिवसांमध्ये हेमा मालिनी यांना धर्मेंद्र यांना भेटू दिले नाही. हेमा मालिनी यांना धर्मेंद्र यांच्यासोबत राहायचे होते. मात्र, धर्मेंद्र यांच्या पहिल्या कुटुंबियांनी तसे होऊ दिले नाही अशा देखील चर्चा रंगल्या आहेत. मात्र, सत्य नेमके काय ? अद्याप समोर आलेले नाही. धर्मेंद्र आणि हेमा मालिनी यांनी १९८० मध्ये लग्न केले होते. हेमा मालिनी धर्मेंद्र यांच्या दुसऱ्या पत्नी आहेत. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नाव प्रकाश कौर असे आहे. धर्मेंद्र आणि प्रकाश कौर यांना ४ मुले आहेत. सनी, बॉबी, अजीता आणि विजेता अशी त्यांच्या मुलांची नावे आहेत.

# गाढविणीचे दूध तब्बल ७ हजार रुपये लिटर!

## काय आहे असे यामध्ये खास?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगभरात गाढविणीच्या दुधाला मोठी मागणी आहे. या एक लिटर दुधाची किंमत तब्बल ५ हजार ते ७ हजार रुपयांपर्यंत आहे. अनेक शहरात या दुधाची मोठी मागणी वाढली आहे. बेंगळुरू आणि हैदराबाद सारख्या आयटी हबमध्ये त्याची मोठी किंमत आहे. २६ नोव्हेंबर हा राष्ट्रीय दूध दिवस म्हणून साजरा होतो. सामान्यपणे गाय अथवा म्हशीचे दूध पितात. काही भागात बकरी, मेंढी, तिथला पारंपारिक प्राण्याचे दूध पितात. मात्र, सध्या गाढविणीच्या दूधाला मोठे महत्त्व आले आहे. त्याचे कारण म्हणजे या दुधाचा भाव ७ हजार रुपये लिटर आहे. गाढवाचा वापर ओझे वाहण्यासाठी करण्यात येतो. मात्र, अनेक शहरात या दुधाची मागणी प्रचंड वाढली आहे. काय आहे या दुधात असे खास? जाणून घेऊयात

गेल्या काही दिवसांपासून ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात गाढविणीच्या दुधाची मागणी वाढत आहे. हे दूध थेट घरोघरी जाऊन विक्री करतात. या दुधावर प्रक्रिया करून त्याचा सौंदर्य प्रसाधनांसह इतर अनेक गोष्टीसाठी वापर करण्यात येतो. माध्यमातील काही वृत्तानुसार, गाढविणीचे दुधाच्या पनीरची किंमत ६५ हजार रुपये प्रति किलोच्या घरात आहे. तर या दुधाची पावडर १ लाख रुपये प्रति किलोपर्यंत विक्री होत असल्याचे सांगितले जाते.



**कुठे होतो या दुधाचा वापर?**
या दुधाचा वापर हा जास्त करून सौंदर्य प्रसाधने तयार करणाऱ्या कंपन्यांमध्ये होतो.

याशिवाय गाढविणीच्या दुधाचे इतरही अनेक फायदे आहेत. यामध्ये प्रोटीन, अँटी- मायक्रोबियल गुण असतात. हे दूध पोटात चांगल्या जीवाणूंच्या वाढीसाठी उपयुक्त मानले जाते. या दुधामुळे पचनाच्या समस्या दूर होतात. पोट गुबारणे, गॅस, अपचन आणि इतर पोट विकारांवर ते गुणकारी मानले जाते. ग्रामीण भागात लहान मुलांसाठी एक चमचा दूध पाजण्याची प्रथा आहे. ज्या लोकांना गाय अथवा म्हशीच्या दुधामुळे त्रास होतो, त्यांच्यासाठी गाढविणीचे दूध हे गुणकारी ठरू शकते. गाढविणीच्या दुधातील पोषक तत्वामुळे रक्तदाबाची समस्या दूर होण्यास मदत होते. रक्त संचार सुधारतो तसेच इतर समस्या दूर होतात.

## कावपिंप्री येथे उद्या पालखी, किर्तन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- तालुक्यातील कावपिंप्री येथे लहरी बाबा पुण्यतिथीनिमित्त रविवार, दि. ३० नोव्हेंबर रोजी पालखी मिरवणूक निघणार आहे. त्यानंतर महाप्रसाद वाटप होईल. रात्री ८ वाजता ह. भ. प. रविकिरण महाराज यांचे किर्तन होईल. पंचक्रोशीतील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पालखी उत्सव व किर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. सकाळी ७ वाजता. पालखी मिरवणूक निघेल. त्यानंतर मंदिर परिसरात महाप्रसादाचे वाटप होईल. श्री. दीपक पाटील, सौ. कल्याणी पाटील, श्री. ऋषीप्रसाद पाटील, सौ. गायत्री पाटील महाप्रसादाचे मानकरी असतील. दरम्यान, रक्तदान शिबिरही होणार आहे. या शिबिराचाही लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# (स्व.) उदयबापू वाघ यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन

## सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष (स्व.) उदयबापू वाघ यांच्या स्मृतीदिनानिमित्त शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी बाजार समितीसमोरील त्यांच्या स्मारक स्थळावर अभिवादन करण्यात आले. यावेळी खासदार स्मिताताई वाघ, भैरवीताई वाघ- पलांडे यांच्यासह सर्व पक्षीय नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

(स्व.) उदयबापू वाघ यांच्या स्मारकावर प्रतिमा पूजन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी ‘उदयबापू अमर रहे’ अशा घोषणा देऊन श्रद्धांजली अर्पण केली. स्मृती दिनानिमित्त सकाळपासूनच स्मारकस्थळी कार्यकर्त्यांची वर्दळ होती. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस, विविध संघटना, पदाधिकारी व कार्यकर्ते, शहर, ग्रामीण भागातील नागरिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. (स्व.) उदयबापू वाघ हे कार्यकर्त्यांचे अत्यंत लाडके नेते असल्याने अनेकांच्या डोळ्यातील अश्रू अनावर झाले होते. (स्व.) उदयबापू वाघ हे केवळ भाजपचे ज्येष्ठ नेतेच नव्हते, तर कार्यकर्ता घडविणारे एक चालते- बोलते विद्यापीठ होते. अमळनेर मतदारसंघासह संपूर्ण जिल्ह्यात त्यांनी कार्यकर्त्यांचे भक्कम जाळे विणले होते. याप्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ. जयश्रीताई पाटील, खानदेश शिक्षण मंडळाचे माजी कार्याध्यक्ष हरी भिका वाणी, डॉ. अनिल शिंदे, पंचायत समितीचे माजी सभापती श्याम अहिरे, भाजप तिर्थक्षेत्र विकास आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश बाविस्कर, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अॅड. व्ही. आर. पाटील, भाजपचे तालुकाध्यक्ष हिरालाल पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे भागवत पाटील, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार गट) नेते प्रशांत निकम, बापूराव महाजन, संदीप पाटील, दिनेश नाईक आदींसह सर्वच क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.





## प्रताप महाविद्यालयात महात्मा फुलेंना अभिवादन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- येथिल खानदेश शिक्षण मंडळ संचलित प्रताप महाविद्यालय अंतर्गत करिअर काऊन्सेलिंग सेंटर येथे महात्मा फुले यांच्या १३५ व्या स्मृती दिनानिमित्ताने प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. हर्षवर्धन जाधव, इतिहास विभाग प्रमुख डॉ. धनंजय चौधरी, करिअर काऊन्सेलिंग सेंटरचे प्रमुख डॉ. विजय तुंटे, पराग पाटील आदींसह अनेक विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते.

## आधार कार्ड यापुढे जन्मतारखेचा पुरावा नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आधार कार्ड हा जन्म तारखेचा पुरावा म्हणून स्वीकारणे बंद करण्याचा महत्वाचा निर्णय मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महायुती सरकारने घेतला आहे. यामुळे आधार कार्डवर आधारीत तयार केलेली सर्व विलंबीत जन्म प्रमाणपत्रे रद्द केली जातील आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल. बनावट जन्म आणि मृत्यू प्रमाणपत्रे रोखण्यासाठी व बेकायदेशीर कामांना आळा घालण्यासाठी हा निर्णय सरकारकडून घेण्यात आला आहे.

# राज्यातील सर्व शाळांची पडताळणी मोहीम !

## विशेष पथकांची नेमणूक; हजारो विद्यार्थ्यांच्या नोंदी तपासणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यात एकाच वेळी सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची एका विशेष पथकाद्वारे राज्यस्तरावरून पडताळणी करण्यात येणार आहे. संबंधित पडताळणीअंती अनियमितता किंवा चुकीच्या पद्धतीने विद्यार्थी प्रविष्ट झाल्याचे दिसून आल्यास सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित केली जाईल. त्यानंतर शिस्तभगांची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असा इशारा प्राथमिकचे संचालक शरद गोसावी आणि माध्यमिकचे संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिला आहे. प्राथमिक आणि माध्यमिकच्या संचालकांनी दिलेल्या निर्देशानुसार, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून संचमान्यता यू-डायस प्लस प्रणालीतील मुख्याध्यापकांनी नमूद माहितीच्या आधारे केली जाणार आहे. यू-डायस प्लस प्रणालीवर मुख्याध्यापक लॉगिनमधून विद्यार्थ्यांची माहिती भरण्यात आलेली आहे. ही माहिती संचमान्यतेसाठी विचारात घेतली जाते. या माहितीचे प्रमाणीकरण व सत्यता पडताळणीची जबाबदारी केंद्रप्रमुख व गटशिक्षणाधिकारी यांची आहे. केंद्रप्रमुखांनी काळजीपूर्वक त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची खातरजमा करणे आवश्यक आहे. यात अनियमितता झाल्यास तशी जबाबदारी केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (बीट) व गटशिक्षणाधिकारी व मुख्याध्यापकांवर निश्चित करण्यात येईल. मुख्याध्यापकांनी भरलेली माहिती केंद्रप्रमुख लॉगिनला फॉरवर्ड करण्यात आली आहे.

यू-डायस प्लसवरील स्टुडंट पोर्टलवर प्राप्त झालेली माहिती केंद्रप्रमुख यांनी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी दैनंदिन उपस्थिती, भेटीच्या दिवशी हजर असलेले विद्यार्थी, परीक्षा दिनांकास उपस्थित असलेले विद्यार्थी तसेच यापूर्वी शाळेला भेट दिल्यानंतर त्या दिवशीची दैनिक उपस्थिती, या सर्वांचा विचार करून केंद्रप्रमुखांनी त्यांच्या लॉगिनमधून बनावट विद्यार्थी, सतत गैरहजर असणारे, केवळ शिक्षक-शिक्षकेतर पदे मंजूर होण्यासाठी जाणीवपूर्वक वाढविलेले पट विद्यार्थी संचमान्यतेसाठी पुढे पाठविले जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### पडताळणी १५ डिसेंबरपर्यंत अंतिम करा

प्रणालीवरील प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थी चुकीच्या पद्धतीने समाविष्ट झाले असल्यास असे विद्यार्थी केंद्रप्रमुखांनी कमी करून गटशिक्षणाधिकारी यांच्या लॉगिनला फेर पडताळणीसाठी वर्ग करावेत. गटशिक्षणाधिकाऱ्यांनी फेर पडताळणीसाठी वर्ग केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती पुन:पडताळणी करून व नमूद विद्यार्थी यांची माहिती योग्य असल्याची खात्री पटल्यास ती माहिती अंतिम करणे गरजेचे आहे. जे विद्यार्थी चुकीच्या पद्धतीने भरल्याचे निदर्शनास आले आहेत, असे विद्यार्थी कमी करावेत आणि संबंधित पडताळणी १५ डिसेंबरपर्यंत अंतिम करावी, असे आदेश देण्यात आले आहे.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘चमकण्याची’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

**जाहिरात दर**

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

**जाहिरात बुकिंगसाठी संपर्क**
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# शब्द जरा जपून वापरा अन्यथा अनर्थ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

स्त्री असो वा पुरुष बोलताना शब्द जपून वापरावेत. नाही तर किती मोठा अनर्थ घडू शकतो, हे महाभारताच्या उदाहरणावरून लक्षात येईल. महाभारताचे युद्ध अठरा दिवस चालले. याचा द्रौपदी यांना खूप त्रास झाला. शरीराने व मनाने त्या खूप खंगल्या होत्या, वयस्कर दिसत होत्या. हस्तिनापुरात सर्वदूर विधवा दिसत होत्या. अनाथ मुले इकडे-तिकडे फिरत होती. एखाद-दुसरा पुरुष दिसत होता. सर्वांची महाराणी द्रौपदी हस्तिनापुराच्या महालात झोपल्या होत्या. तेव्हा भगवान



श्रीकृष्ण त्यांच्या कक्षात आले. त्यांना पाहून द्रौपदी यांना राहावले नाही. त्यांनी भगवान श्रीकृष्ण यांना विचारले, की कृष्णा, असा तर मी विचारच नव्हता केला. असे कसे झाले?
भगवान श्रीकृष्ण म्हणाले, की पांचाली नियती खूप निष्ठूर असते. ती आपल्या मनाप्रमाणे चालते. द्रौपदी, तुला कौरवांचा बदला घ्यायचा होता ना? तू यशस्वी झालीस. फक्त दुर्योधन आणि दुःशासन नाही, तर सर्वच कौरव संपले. द्रौपदी, तुला तर आनंदच व्हायला हवा होता?
द्रौपदी म्हणतात, की कृष्णा, तू मला सावरायला आला आहेस की हिणवायला? भगवान योगेश्वर म्हणतात, की नाही द्रौपदी, मी तुला त्यातले वास्तव सांगायला आलो आहे. आपल्या कर्माची फळे आपल्याला दिसत नाहीत. पण ती समोर येतात तेव्हा आपण काही करू शकत नाही. द्रौपदी विचारतात, की कृष्णा, मग या युद्धाला मीच पूर्णपणे जबाबदार आहे, असे तुला म्हणायचे आहे का? भगवान श्रीकृष्ण म्हणतात, की नाही. द्रौपदी, तू स्वतःला इतके महत्त्व देऊ नकोस. तू तुझ्या कर्मात थोडा जरी दूरदर्शीपणा दाखविला असतास तर तुला एवढा त्रास झाला नसता. द्रौपदी विचारतात, की कृष्णा, मी काय करू शकत होते? भगवान श्रीकृष्ण म्हणतात, की तुझ्या स्वयंवरावेळी तू कर्णाचा अपमान करायला नको होतास. त्यानंतर कुंतीने तुला पाच पांडवांची पत्नी होण्याचा आदेश दिला. त्याचा तू स्वीकार केला नसतास, तर परिणाम काही वेगळे झाले असते. त्यानंतर तू तुझ्या महालात दुर्योधनाच्या वर्मावर घाव घालणारे वाक्य बोललीस. ‘ आंधळ्या बापाचा आंधळा मुलगा ’ असे म्हणून जोरात हसत त्याचा ‘ सार्वजनिक अपमान ’ केला नसतास तर तुझे वस्त्रहरण झाले नसते. कदाचित त्यावेळीही परिस्थिती वेगळी असती.
आपले शब्दच आपले कर्म बनवितात. आपण आपला प्रत्येक शब्द विचार करून बोलायला हवा. नाही तर त्याचे दुष्परिणाम फक्त स्वतःलाच नाही तर आपल्या पूर्ण परिवाराला भोगावे लागतात.
जगात फक्त मानव असा एक प्राणी आहे, की त्याच्या दातात नाही तर जिभेत विष आहे. म्हणून बोलताना भान ठेवणे महत्त्वाचे असते. बेलगाम बोलण्यानेच, लिहिण्यानेच नाती तुटतात व प्रपंचात महाभारत घडते.



# शिवशंकर महादेव ज्योतिर्लिंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमरकंटक में ३५०० फीट की ऊँचाई पर मैकाल, सतपुड़ा और विंध्य पर्वत माला के मध्य एक वैभवपूर्ण भव्य मन्दिर का निर्माण किया गया था!

श्रीयन्त्र महामेरू मन्दिर का प्रवेशद्वार आश्चर्यजनक, लुभावना और जटिल वास्तुशिल्प से निर्मित किया गया है। मन्दिर के प्रवेशद्वार पर चार मुखाकृतिवाली एक विशाल मूर्ति है। जिनमे देवी काली, देवी लक्ष्मी, देवी सरस्वती, व देवी भुवनेश्वरी की मुखाकृति बनाई गई हैं। उनके ठीक नीचे ६४ योगिनियों (देवी की सहयोगियों) की छोटी आकर्षक मूर्तियाँ गढ़ी गई हैं। ये पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण चारों ओर १६-१६ लघु मूर्तियाँ लगी हैं। उसके नीचे देवियों, नर्तकियों की आकर्षक मूर्तियों का निर्माण किया गया है अस्त्र-शस्त्र व वाद्ययंत्रों से सुसज्जित हैं।

इस मन्दिर का निर्माण ज्योतिष के अनुसार गुरु पुष्प नक्षत्र में १९९१ ई. में आरम्भ किया गया था क्योंकि निर्माण के लिए यह नक्षत्र सबसे शुभ माना गया थाइनमें एक अलौकिक आकर्षण शक्ति है जो दर्शनार्थियों को मन्त्रमुग्ध कर देते हैं, सम्मोहित कर देते हैं। सौन्दर्यपूर्ण सनातन धरोहर...!

# रत्नागिरीतील अठरा हातांचे गणपती बाप्पा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रत्नागिरी जिल्ह्याला लाभलेल्या १७० किलोमीटरच्या किनारपट्टी भागात अनेक देवदेवतांची मंदिरे आहेत. प्रत्येक मंदिराला वर्षानुवर्षांचा इतिहास लाभलेला आहे. त्यातील एक मंदिर म्हणजे रत्नागिरीतील प्रतिष्ठित असे अठरा हाताच्या गणपतींचे आहे. संकष्टी, अंगारकीसह, गणेश चतुर्थी, माघी गणेशोत्सवासह दर मंगळवारी दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागतात. अठरा हात हे या गणती बाप्पांचे वेगळेपण आहे. अशा या प्रसिध्द गणपती बाप्पांची आख्यायिका जाणून घेऊया....!
रत्नागिरीतील गाडीतळ येथे राहणारे (स्व.) विनायक कृष्णाजी जोशी हे पोस्टात नोकरीला होते. त्यांची बदली राजापूरला झाली. कोटा संस्थानात राहणारे अच्युतानंदतीर्थस्वामी हे राजापूरला येत होते. एकदा या स्वामींच्या दर्शनाला विनायक जोशी गेले. त्यांच्या प्रवचनाला ते बसले. स्वामींनी विनायक (स्व.) जोशी यांना तू प्रत्यक्ष गणपती आहेस, तू माझ्याबरोबर चल असे सांगितले. (स्व.) जोशी यांना घेऊन अच्युतानंदतीर्थस्वामी पुढे रवाना झाले. त्यानंतर १९४५- ४६ मधे पुन्हा अच्युतानंदतीर्थ स्वामी परत राजापूरला आले. त्यांनी (स्व.) जोशींना मंत्र दिला. तसेच चांगल्या स्थानी जाऊन तप कर असे सांगितले. श्री. जोशी गणपतीपुळे येथे गेले आणि त्यांनी तेथे २१ दिवस तप केले. त्या काळात ते जेवले नाहीत. स्वामींनी दिलेल्या मंत्राचा (स्व.) जोशी यांनी जप केला. तेव्हा



गणपतीच्या अंगावरील फुले यांच्या हातात येऊन पडली. त्यांनी १९४८ नंतर २१ वर्षे जप केला. त्यानंतर त्यांना दृष्टांत झाला, की आता तू माझी मूर्तीरूपाने प्रतिष्ठापना कर. त्याप्रमाणे १९६६मध्ये हे देऊळ बांधले व १९६७ मध्ये ज्येष्ठ वद्य अष्टमीला स्थापना केली.

### मार्गशीर्ष शुक्ल चतुर्थीला जन्मोत्सव करतात

याच तिथीला (स्व.) जोशी यांचा जन्म झाला होता. देवी व गणपतीचे रुप असलेला हा गणपती आहे. श्री अच्युतानंदतीर्थ यांनी देवीची उपासना करा अशी सुचना सर्वांना केली होती. फक्त (स्व.) जोशी यांनी गणपतीची उपासना केली. गणपतीची स्थापना केल्यानंतर गणपतीला अठरा हात होते. म्हणून अठरा वर्षे तप केले. शेवटी २१ दिवस काही न खाता पिता त्यांनी उपास केला आणि १९८२ मध्ये त्यांनी देह ठेवला. १९८१ ला या मंदिराला २५ वर्षे पूर्ण झाली.

फाटक हायस्कूलच्या जरा पुढे गेल्यावर हे मंदिर आहे.

### या मंदिराची व्यवस्था

(स्व.) विनायक जोशी यांना जगन्नाथ, महादेव, दत्तात्रय, पद्यनाभ, राधाकृष्ण, धुंडीराज असे सहा पूत्र आहेत. ते सर्व तेथेच राहतात. त्यांच्यापैकी कोणीही नियमित पूजाअर्चा करतात. त्यांच्यापैकी दोन ते तीन भाऊ कीर्तन करतात. गाभाऱ्यात कोणालाही जाऊ देत नाहीत. येथे दरवर्षी नाटक करतात. त्यात घरचेच लोक काम करतात. गणेशवाडीचे कीर्तनकार श्री. काणे हे उत्सवात कीर्तनासाठी गेली २१ वर्षे येत आहेत. डेरवण येथील विठ्ठलरावजी जोशी हे श्री अच्युतानंदतीर्थ यांचेच शिष्य होते. गाभाऱ्यात चौथऱ्यावर श्रीगणेशांची ६९ सें.मी. रुंद आणि ६९ सें.मी. उंचीची संगमरवरी १८ हातांची प्रसन्न मूर्ती आहे. तिच्या डोक्यावर छत्र आहे. श्रीगणपतींच्या डाव्या अंगाला संगमरवरी ३० सेंमी लांबीचा या गणपतींना अठरा हात आहेत. सोळा हात देवीचे आणि दोन हात गणपतींचे मिळून अठरा हात आहेत. या मंदिरातील मूर्ती राजस्थानातून करून आणली आहे. गाभाऱ्याबाहेर कोनाड्यात शिवपिंडी व मारुतींची मूर्ती आहे. गेली अनेक वर्षे रत्नागिरीतीलच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रातील भक्तगण या मंदिरात दर्शनासाठी येतात.



# मेहेर बाबा अर्थात ‘दयाळू बाबा’

मेहेर बाबा (जन्म : २५ फेब्रुवारी १८९४; - ३१ जानेवारी १९६९) (जन्मनाव मेरवान शेरियार इराणी) हे भारतीय गूढवादी व आध्यात्मिक गुरू होते. १९५४ मध्ये आपण या युगातील अवतार आहोत, अशी जाहीर घोषणा त्यांनी केली होती. बालपणात त्यांच्यामध्ये अध्यात्माचा ओढा असण्याची कोणतीही चिन्हे दिसली नाहीत. वयाच्या एकोणिसाव्या वर्षी हजरत बाबाजान या मुस्लिम साध्वींशी त्यांचा परिचय झाला आणि सात वर्षे चाललेली आध्यात्मिक रूपांतरणाची प्रक्रिया सुरू झाली.
पुढच्या काही महिन्यांमध्ये आणखी चार आध्यात्मिक व्यक्तींशी त्यांनी संपर्क साधला. उपासनी महाराज यांच्या समवेत ते सात वर्षे राहिले. नंतर त्यांनी सार्वजनिक कार्य सुरू केले. पर्शियन भाषेत मेहेर बाबाचा अर्थ ‘दयाळू पिता’ असा होतो. सुरूवातीच्या काही अनुयायांनी त्यांना हे नाव दिले.
१० जुलै १०२५ पासून आयुष्याच्या अंतापर्यंत मेहेर बाबा शांत राहिले. विशिष्ट हातवारे किंवा मुळाक्षरांचा फलक वापरून ते संवाद साधत होते. मंडळींसमवेत (शिष्यवर्तुळ) त्यांनी एकांतात बराच काळ व्यतीत केला. भरपूर प्रवास करीत त्यांनी सार्वजनिक मेळे भरविले. महारोगी, गरीब, मानसिक रुग्णांसाठी अनेक धर्मार्थ कार्ये केली. मेहेरबाबा १९२५ पासून ते मृत्यू पावेतो काहीही बोलले नाहीत.


# मालक म्हणजे कोण?

मालक म्हणजे दगडाला आकार देणारा मूर्तिकार. मालक म्हणजे त्या मूर्तीमध्ये जीव भरणारा कृपावंत. मालक म्हणजे प्रत्येक भक्ताच्या दगडी मनात गाभारा करणारा. कारागीर. मालक म्हणजे जीवनात आपला शेवटचा नाही, तर पहिला एकमेव एक पर्याय. मालक म्हणजे काहीतरी द्यायला किंवा काही पूर्ण करायला जीवनात आला नाहीतर जीवन पूर्णत्वाला न्यायला आलेला वाटाड्या.

मालक म्हणजे भाग्याच्या रेषा हातावर नसताना त्या अचूक उमटवून भाग्यात नाही ते देणारा भाग्यकार. मालक म्हणजे दमलेल्या-थकलेल्या जीवनाच्या वाटेवरील आपला प्रवास सुखकर करणारा सहप्रवासी. मालक म्हणजे ज्याच्या नुसत्या स्पर्शाने राशींचा खेळ, पत्रिका, हस्तरेषा, कुंडली, भाग्य, नशीब अन् यातही नाही ते सगळे देणारा त्यांचा शंकरस्पर्श.

# खालील उपाय केल्याने निश्चित आर्थिक व मानसिक लाभ

अशी मान्यता आहे, की
१) सूर्योदयानंतर कधीही झोपून राहू नये. दिवसा अधिक वेळ झोपणाऱ्या माणसावर व सायंकाळी झोपून राहणाऱ्या माणसावर लक्ष्मी कधीच प्रसन्न होत नाही.
२) घरामध्ये नेहमी वाईट बोलणे, शिवीगाळ करणे, आरडाओरड करणे या गोष्टी टाळाव्यात.
३) रोज देवघरात सकाळ-सायंकाळ तुपाचा दिवा अवश्य लावावा.
४) शुक्रवारी सायंकाळी एखादी सुवासिनी घरी आल्यास तिला हळद-कुंकू लावावे व थोडी साखर अवश्य द्यावी.
५) अकरा मंगळवारी गूळ घातलेले दूध पिंपळाच्या वृक्षास घालावे.
६) अंघोळीनंतर चिमूटभर काळे तीळ व चिमूटभर पांढरे तीळ छतावर टाकावेत, फ्लॅटमधील व्यक्तींनी आपल्या गॅलरीत किंवा घराबाहेर उघड्या आकाशात फेकावीत.
७) दररोज श्रीसूक्ताचे पठण करावे.
८) सायंकाळी घरामध्ये कापूर होम अवश्य करावा.
९) रोज घरातील ज्येष्ठ मंडळींच्या पाया पडूनच घराबाहेर निघावे.
१०) सूर्यनारायणाला रोज नमस्कार करून पाणी द्यावे.
११) धार्मिक व्यक्ती व कार्य यांची चेष्टा करू नये.
१२) व्यसनमुक्त राहावे.



# पाणी पिण्याच्या भांड्यांजवळही दिवा का लावावा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

पिण्याच्या पाण्याच्या भांड्यांजवळही एक दिवा लावावा. ज्या दिवशी शक्य असेल त्या दिवशी एक फूल देखील तेथे वहावे. मनोभावे पाण्याच्या सर्व भांड्यांना हात जोडून कृतज्ञता व्यक्त करावी. हे सर्व वाचत असताना काही जणांना विचित्र वाटू शकेल. कोणाला हास्यास्पदही वाटेल. मात्र एका डॉक्टरांच्या मते विज्ञानाच्या परीक्षेतून तावून-सुलाखून पाहिल्याशिवाय सहसा कोणत्याही गोष्टीवर विश्वास ठेवू नये, असे सर्वश्रुत मानले जाते. त्याप्रमाणे सहा महिन्यांपूर्वी ‘ पाणी ’ या विषयावर अत्यंत अभ्यासपूर्ण असे संशोधन हाती लागले. त्यानंतर चक्क काही धार्मिक पुस्तकांमध्ये त्याचे जसेच्या तसे संदर्भही मिळाले, ते असे...
१) पाणी म्हणजे जीवन. पाण्याला स्वतःची विशिष्ट अशी एक स्मरणशक्ती असते.
२) पाणी पिताना ज्या प्रकारचे आपले विचार असतात किंवा ज्या मानसिक स्थितीमध्ये आपण पाणी पितो त्याचा प्रचंड परिणाम पाण्यावर आणि पर्यायाने आपल्यावर होतो.
३) पाण्यामध्ये बाहेरून येणाऱ्या प्रत्येक प्रकारच्या ऊर्जेप्रमाणे बदल होतात. त्या बदलांप्रमाणे ते शरीरावर परिणाम करत असते.
४) पाणी हे प्रत्येक व्यक्तीच्या शरीरावर वेगवेगळ्या प्रकारे कार्य करते. आपल्या शरीराचा जवळपास ७०-७५ टक्के भाग हा पाण्याने बनलेला आहे. म्हणजेच शरीराचे कार्य कसे चालावे हे मुख्यत्वे आपण जे पाणी ग्रहण करतो तेच ठरवत असते.
५) पाणी पितानाचे विचार, पाण्याकडे पाहण्याची दृष्टी किंवा नजर, पाणी पिताना आजूबाजूला येणारे आवाज, पाणी पिताना मनातील भावना किंवा तोंडातून निघणारे उच्चार या सर्वांचा पाण्यावर प्रचंड परिणाम होतो. जे प्रत्यक्षात मायक्रोस्कोपखाली पाहताही येते.
६) मानसिक स्थिती जर प्रचंड सकारात्मक असेल आणि हातातील पाण्याविषयी जर प्रचंड कृतज्ञ असाल, तर गढूळ किंवा दूषित पाणी



देखील काहीही अपाय करू शकत नाही. मानसिक स्थिती नकारात्मक असेल आणि पाणी पिताना जर पाण्याविषयी बेफिकीर असाल, तर अतिशय शुद्ध पाणी देखील प्रचंड अपायकारक ठरू शकते.
७) पाणी हे ‘जीवंत ’ असून, मानवाची मज्जासंस्था ज्याप्रमाणे कार्य करते त्याप्रमाणे पाणी आणि त्याची ‘ पेशीसंस्था ’ करू करते.
८) जे पाणी हातात धरून किंवा जवळ ठेवून प्रेमाच्या भावना मनामध्ये आणल्या जातात त्या पाण्याच्या पेशींचा किंवा कणांचा आकार खूपच सुंदर असतो. जे पाणी हातात धरून किंवा जवळ ठेवून राग किंवा द्वेष अशा भावना मनात आणल्या जातात त्या पाण्याच्या कणांचा आकार खूपच विचित्र आणि ओबड-धोबड असतो.
९) ज्या प्रकारे पाणी पिताना पाण्याला ‘ ट्रीट ’ करता पाणी ते खूप जास्त काळापर्यंत ‘ लक्षात ठेवते ’ आणि त्याप्रमाणे शरीरावर चांगले किंवा वाईट परिणाम करते.
१०) पाण्याचा विचार सध्या ‘ लिक्वीड कॉम्प्युटर ’ म्हणून देखील केला जातो. त्यामध्ये पाण्याचा ‘ लक्षात ठेवणे ’हा गुणधर्म वापरला जात आहे.
११) तुम्हाला जो काही चांगला उद्देश साध्य करायचा आहे, ‘ तो उद्देश एका हातात पाण्याचा ग्लास घेऊन मग मनामध्ये बोलून मग ते पाणी पिणे ’ यासारख्या विविध ‘ वॉटर थेरपी ’ सध्या पाण्याच्या याच गुणधर्मांचा वापर करून उदयास येत आहेत.
१२) ही सगळी वैज्ञानिक माहिती असून, ज्यांना आणखी डिटेल माहिती हवी असेल त्यांनी इंटरनेटवरून पाण्यावरील संशोधन शोधून वाचावे.
आता या पाण्याच्या दिव्य आणि शक्तिशाली क्षमतांची सांगड आपल्या संस्कृती आणि चालिरीतींशी घालण्याचा प्रयत्न केल्यावर जे काही हाती लागले त्यावरून संबंधित डॉक्टर गेल्या सहा महिन्यांपासून खालील गोष्टी करीत आहेत.
१) पिण्याचे पाणी तांब्याच्या भांड्यात ठेवूनच साठवावे. शक्यतो तांब्याच्या ग्लासनेच प्यावे. कारण तांबे हा धातू ऊर्जेचा ‘ सुवाहक ’ आहे.
२) रोज रात्री ते तांब्याचे भांडे चिंच आणि हळद वापरून धुवावे.
३) त्यानंतर त्यामध्ये स्वच्छ पाणी सुती कपड्यामधून गळून भरावे.
४) यानंतर या पाण्याच्या भांड्याच्या बाजूला एक दिवा लावून भांड्यावर एक फूल ठेवावे. पाण्याविषयी मनामध्ये अत्यंत कृतज्ञतेचे भाव आणून हात जोडावेत. (आम्हाला आयुष्य, आरोग्य आणि जीवन प्रदान केल्याबद्दल आभारी आहोत, असे किंवा या प्रकारचे कोणतेही चांगले विचार मनात आणून कृतज्ञता व्यक्त करू शकता.)
५) सकाळी उठल्यानंतर याच भांड्यातील पाणी पिऊन दिवसाची सुरूवात करावी.
६) पाणी पिण्याचा सर्वांत योग्य मार्ग म्हणजे दोन हातांच्या ओंजळीत घेऊन पिणे. परंतु ते आपल्याला शक्य नसते. त्यामुळे पाणी पिताना ज्या भांड्यामध्ये किंवा पेल्यामध्ये प्याल तो दोन्ही हातांनी पकडून पाणी पिणे.
७) पाणी पिताना जाणीवपूर्वक काही सेकंद पाण्याचा ग्लास दोन्ही हातात धरून मनामध्ये चांगले विचार, चांगल्या भावना आहेत याची खात्री करूनच पाणी प्यावे.
८) हीच गोष्ट कोणाच्या घरी गेल्यावर किंवा बाहेर गेल्यावर कुठले पाणी पिण्याची वेळ आली तर जाणीवपूर्वक थोडी जास्त वेळ करावी.
९) केवळ तहान लागल्यावरच पाणी प्यावे. सारखे-सारखे विनाकारण पिऊ नये.
१०) आहारामध्ये पाणी जास्त प्रमाणात (८० ते ९० टक्के) असलेल्या घटकांचा म्हणजेच फळांचा जास्तीत जास्त समावेश करावा.
या प्रकारे पाणी पिण्यामुळे आणि वर दिलेल्या सर्व गोष्टी गेले सहा महिने सलग केल्यामुळे पहिल्या दिवसापासून झालेले फायदे :
१) मुलगी, जी दर महिन्याला आजारी पडत होती. तिला अँटिबायोटिक्स दर महिन्याला द्यावे लागत होते, ते पूर्ण बंद झाले.
२) मानसिक आणि शारीरिक स्वास्थ्य खूप चांगले झाले. जे काही महिन्यांपूर्वी प्रचंड बिघडले होते.
३) घरातील लोकांचा ॲसिडिटीचा त्रास जवळपास बंद झाला.
४) रोज सकाळी घरातील वातावरण खूपच छान, हसते-खेळते आणि ऊर्जेने भरलेले असते.
५) पाण्याकडे आणि एकूणच स्वयंपाकघराकडे बघण्याचा दृष्टिकोन प्रचंड बदलला.
६) एखाद्या दिवशी दिवा लावायचा विसरले, तर पाण्याच्या चवीमध्ये जाणवण्याइतका फरक नक्की दिसतो.